**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** दौंड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0692 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2025 13:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/03/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/03/2025

**Time From (वेळेपासून):** 12:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/11/2025 **Time (वेळ):** 13:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 013

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 13:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दौंड नगरपरिषद कार्यालय ता दौंड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** दौंड

**District(State) (जिल्हा(राज्य)):** पुणे ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती भाग्याश्री येळवे | | | 1. लेखापरिक्षक दौंड नगरपरिषद , दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.ओंकार मेनसे क्लर्क अकाऊंट विभाग | | | 1. दौंड नगरपरिषद जि पुणे ,दौंड , पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 07/11/2025

मी निता चत्रभुज मिसाळ, वय 46 वर्षे, पद- पोलीस उप अधीक्षक / सहा. पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, मोबाईल नंबर 9822214414, ई मेल अॅड्रेस- nitamisal79.nm@gmail.com

मी वरीलप्रमाणे असून मागील एक वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस उप अधीक्षक/सहा. पोलीस आयुक्त या पदावर नोकरीस आहेत.

दिनांक 06/03/2025 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, पुणे कार्यालयात हजर असताना 13.30 वाजणेचे सुमारास आमचे प्रशासन प्रमुख श्री. दयानंद गावडे, सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, पुणे यांनी आम्हाला त्यांचे कार्यालयात बोलावून त्यांचे समक्ष हजर असलेले इसमाचे नाव श्री.फत्तुभाई ऊर्फ शफीक रहिमान मुलाणी, रा. मळद, ता. दौंड, जि. पुणे, पिन 413130, मोबाईल नंबर 9763470244 असे असल्याचे सांगून त्यांची लाचेची तक्रार असून, त्यांची तक्रार घेवून पुढील कारवाई करावी अशा सुचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही सदर तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवून आलो. आमचे कक्षात आल्यावर तक्रारदार यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता फत्तुभाई ऊर्फ शफीक रहिमान मुलाणी, रा. मळद, ता. दौंड, जि. पुणे, पिन 413130, मोबाईल नंबर 9763470244 असे सांगीतले.सदर वेळी आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करता त्यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितल्यानंतर ती लिहून दिली. तिचा आशय खालीलप्रमाणे-

"माझी पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेस प्रा.लिमीटेड या नावाने सुरक्षा रक्षक पुरविण्याची कंपनी आहे. तसेच माझी पत्नी सौ. नुतनबी शफीक ऊर्फ फत्तुभाई मुलानी यांची पुण्याई एंटरप्रायझेस नावाने कुशल, अकुशल मजुर पुरवठा करणारी कंपनी आहे. दौंड नगरपरिषद, दौंड, जि. पुणे यांचेकडील दिनांक 21/04/2022 रोजीच्या पत्रानुसार माझ्या कंपनीस 20 सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत निविदा मंजुर झालेली आहे. तसेच त्यांच्याकडील दिनांक 28/12/2022 रोजीच्या पत्रानुसार माझ्या पत्नीच्या पुण्याई एंटरप्रायझेस या कंपनीकरीता कुशल-5 पुरूष कामगार व अकुशल-4 पुरूष कामगार पुरविणेबाबत वर्क ऑर्डर प्राप्त झालेली आहे. तसेच माझ्या पत्नीच्या कंपनीस कुशल-अकुशल कामगारांची पुरक आदेश काढून नगरपरिषदेकडून वेळोवेळी मागणी केली जाते. माझे पत्नीचे कंपनीचे कामकाज करण्याकरीता माझ्या पत्नीने मला अधिकारपत्र दिलेले आहे. माझे पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेस कंपनीचा दि. 31/12/2024 रोजीपर्यंत कामकाजाचा पुरक आदेश पारीत झालेला आहे. परंतु पुढील कालावधीचा पुरक आदेश मला अद्याप मिळालेलला नाही. तथापि सध्याही मी सेक्युरिटी गार्ड पुरवित असल्याने दिनांक 31/12/2024 नंतरचे कालावधीचा पुरक आदेश मिळण्यासाठी मी वारंवार प्रयत्न करीत आहे.

माझ्या पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेस तसेच पत्नीचे पुण्याई एंटरप्रायझेस या कंपनीकडून दौंड नगरपरिषदेस सेवा पुरविल्यानंतर आमच्या कंपन्यांकडून पुरविलेल्या सेवेबद्दल दौंड नगरपरिषदेकडून देयक काढले जाते. देयक मला मिळाल्यानंतर दौंड नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांचेकडुन जेवढया महिन्यांचे देयक बिल आहे तेव्हढया महिन्यांचे पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेसकरीता प्रति महीना रू. 20,000/- प्रमाणे व पुण्याई एंटरप्रायझेसकरीता प्रति महिना रू. 15,000/- बक्षीस म्हणुन लाच मागणी मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांनी केली होती. त्यानुसार मी ऑक्टोबर 2024 मध्ये त्यांना पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेकरीता रू. 20,000/- व पुण्याई एंटरप्रायझेसकरीता रू. 15,000/- रक्कम दिली होती. माझे नोव्हेंबर 2024 ते आजपर्यंत पुरविलेल्या सेवेची देयके पेंडींग आहेत त्याकरीता मी दिनांक 04/03/2025 रोजी दौंड नगरपरिषदेत गेलो होतो. त्यावेळी सी. ओ.श्री. विजय कावळे यांनी माझ्याकडे पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेकरीता देयकातील एकुण महिन्यांचे प्रति महिना रू. 25,000/- व पुण्याई एंटरप्रायझेसकरीता रू. 20,000/- रक्कमेची बक्षीस म्हणून माझ्याकडे मागणी केलेली आहे. तसेच माझ्या पुण्याई सिक्युरिटी सव्हीसेस या कंपनीचा पुरक आदेश काढण्याकरीता रू. 10,000/-

रक्कमेची मागणी केली आहे. तसेच सी.ओ. श्री. विजय कावळे यांनी मला सांगितले आहे की, पैसे देताना हिरव्या रंगाचे पाकीटाचे वर माझे नाव टाकून त्यावर ज्या महिन्याचे देयक आहे तो महिना टाकून खालच्या बाजूस शिक्का व सही करून त्यात रक्कम टाकून माझ्याकडे दया असे त्यांनी सांगितलेले आहे.

मी व माझी पत्नी दौंड नगरपरिषदेस पुण्याई सिक्युरिटी सव्र्हीसेस तसेच पुण्याई एंटरप्रायझेस या कंपनीमार्फत पुरवित असलेल्या सेवेची देयके पास करताना लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे या देयकाची अंतिम तपासणी करुन ते मुख्याधिकारी यांचे समक्ष मान्यतेसाठी सादर करण्याचे काम करतात. देयके पारित झाल्यानंतर बक्षीस म्हणून माझ्याकडे प्रतिमहीना रू. 10,000/- मागणी करतात. त्यांच्याकडे मी नोव्हेंबर ते आजपर्यंतचे बिलाबाबत दि. 04/03/2025 रोजी चौकशी केली तेव्हा त्या मला म्हणाल्या की, मी बिल पारीत करवून घेते तुम्ही मला ठरल्याप्रमाणे प्रति महीना 10,000/- प्रमाणे रक्कम दया असे म्हणून माझ्याकडे बक्षीस म्हणून पैशांची मागणी केलेली आहे.

दौंड नगरपरिषदेस पुण्याई सिक्युरिटी सव्र्हीसेस तसेच पुण्याई एंटरप्रायझेस या कंपनीमार्फत पुरवित असलेल्या सेवेची देयके पास करताना ओंकार मेनसे हे क्लार्क असून ते नगरपरिषदेतील पास झालेल्या देयकांची माहिती व व्हाउचरची माहिती माझ्याकडे देत असतात. त्याकरीता ते मला बिल पास झाल्यानंतर पास झालेल्या बिलाचे बक्षीस म्हणून माझ्याकडे प्रतिमहीना रू. 5,000/- मागणी करतात. त्यांच्याकडे मी नोव्हेंबरचे बिलाबाबत दि. 04/03/2025 रोजी चौकशी केली तेव्हा त्यांनी मला तुमचे दोन-तीन दिवसात नोव्हेंबर महिन्याचे बिल पास होईल तुम्ही मला ठरल्याप्रमाणे प्रति महीना 5,000/- प्रमाणे रक्कम दया असे म्हणून माझ्याकडे बक्षीस म्हणून पैशांची मागणी केलेली आहे.

माझ्याकडे दौंड नगरपरिषदेचे सी.ओ.श्री. विजय कावळे, लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे व अकाउंट विभागातील क्लर्क श्री. ओंकार मेनसे हे मागणी करीत असलेली रक्कम ही लाचेची रक्कम आहे. मी जर त्यांना बक्षिसाची रक्कम दिली नाही तर ते माझे डिसेंबर महिन्यापासून पुढील देयके पास करणार नसल्याची माझी खात्री झाली. तसेच मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. तरी तुमच्या अॅन्टी करप्शन विभागाकडून पुढील कार्यवाही व्हावी." अशा आशयाची तक्रार दिली. सदरची तक्रार ही दिनांक 06/03/2025 रोजी 16.00 वा. नोंदविली.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे कारवाई करीता दोन शासकीय पंच आवश्यक असल्याने दरम्यानचे कालावधीत श्री. दयानंद गावडे, सहा. पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., पुणे यांनी मा. अपर राज्यकर आयुक्त-1, पुणे विभाग, येरवडा, पुणे यांना लेखी पत्रव्यवहार करून गोपनीय कामाकारीता पंचांना दिनांक 06/03/2025 रोजी 16.00 वा. कार्यालयात उपस्थित राहण्याची सुचना दिली होती. त्याप्रमाणे दोन्ही पंच हे 17.00 वाजता कार्यालयात उपस्थित झाले. तसेच आमचे प्रशासकीय अधिकारी श्री. दयानंद गावडे, सहा. पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., पुणे यंाना पडताळणी कारवाईकरीता मदतनीस अंमलदार व शासकीय वाहन देणेबाबत विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी आम्हास मदतीकरीता पो.हवा./1952/चंद्रकांत जाधव, पो.कॉ./9344/अमोल शिंदे,म.पो.कॉ./7934/वैशाली माकर, चा. पो.कॉ./10674/पांडुरंग माळी यांना त्यांच्या ताब्यातील शासकीय वाहन एरटिगा कार क्रमंाक एम.एच.12/यु.सी. 4109 सह देण्यात आले असल्याचे सांगितले. नमूद पोलीस अंमलदार हे दिनांक 06/03/2025 रोजी 17.00 वा. कार्यालयात उपस्थित झाले. तेथे आम्ही पडताळणी कारवाई पथकाची व पंचाची एकमेकांशी ओळखी करुन दिली. त्यांची नावे 1) श्री.विशाल पांडुरंग मुळे, वय 29 वर्षे, पद –राज्य कर निरीक्षक, जी.एस.टी.भवन-1, पुणे व 2) श्री. नारायण रंभाजी साळवे, वय 55 वर्षे, पद ––राज्य कर निरीक्षक, जी.एस.टी.भवन-1, पुणे अशी आहेत. त्यानंतर तक्रारदार, सापळा पथक व पंच यांना आमचे कक्षामध्ये बोलावुन आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली व त्यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवर पंचांनी सहया केल्या. पडताळणीकरीता पंच क्र.1 म्हणून श्री. विशाल मुळे यांनी कामकाज करण्याचे ठरले. तसेच पडताळणीची पुढील कार्यवाही ही दिनांक 07/03/2025 रोजी नानवीज पोलीस प्रशिक्षण केंद्राजवळील म्हसोबा मंदीराजवळून करण्याचे ठरले.

त्यानंतर तक्रारदार श्री. फत्तुभाई ऊर्फ शफीक रहिमान मुलाणी यांनी नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम लाचेची पडताळणी करण्यात येणार असून, लाचेची मागणी झाल्यास पुढील सापळा कारवाई करणार असल्याचे कळविले. त्यानुसार दिनांक 07/03/2025 रोजी सकाळी 08.00 वाजता ला.प्र.वि.कार्यालय, पुणे येथे हजर झालो. पडताळणी पथकाने चा. पो.कॉ./10674/पांडुरंग माळी यांच्या ताब्यातील शासकीय वाहन एरटिगा कार क्रमंाक एम.एच.12/यु.सी.4109 हीमध्ये पडताळणी व सापळा कारवाई करीता लागणारे शासकीय लॅपटॉप, पिंंटर, काळेपडदे, अॅन्थ्रासिन पावडर, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर,स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य ठेवले. पडताळणी कारवाई पथकातील

आम्ही स्वत:, पो.कॉ./अमोल शिंदे,म.पो.कॉ.माकर, चा.पो.कॉ./पांडुरंग माळी, पंच क्र. 1 व 2 असे ला.प्र.वि. कार्यालयातुन 08.53 वाजणेचे सुमारास रवाना होऊन नानवीज ट्रेनिंग सेंटर रोडने गाडी घेऊन रेल्वे क्रॉसींग पुलापासून डावे बाजूला असणारे म्हसोबा मंदीर परिसरात 11.20 वा. पोहोचलो. तेथे तक्रारदार यांची वाट पाहत असताना तक्रारदार हे श्री. समीर युनुस शेख यांच्या मालकीच्या ब्राऊन रंगाची रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 ही मधुन आले.

त्यानंतरची कार्यवाही ही शासकीय वाहनातून करण्याचे ठरल्याने तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवले. तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची थोडक्यात माहिती दिली. त्यामध्ये नवीन सीलपॅक सॅनडिस्क अल्ट्रा कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. यु.1 एच.सी. आय सी. 10 ए 1 कार्ड त्याचे मागील बाजुस 4425XF4923M5BM MADE IN हे मेमरी कार्ड पंचांसमक्ष फोडून व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले. व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार व पंच क्र.1 श्री. विशाल मुळे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 12.04 वा. रेकॉर्ड केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार, पडताळणी पथक व पंचांना पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर पडतळणी पथकातील पो.हवा.जाधव यांचे मदतीने शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे काखेत बनियनला कोणास दिसणार नाही अशा रितीने लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 श्री. मुळे या दोघांना तक्रारदार यांचेकडील रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 ही मधून चालक श्री. अजहर शौकत शेख यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता 12.11 वा. रवाना केले.तक्रारदार व पंच क्र. 1 हे 14.03 वाजता आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉरडर काढुन तो बंद करण्यात आला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांचेकडे विचारणा करता त्यांनी सांगितले की, ते दौंड नगरपरिषद कार्यालय, दौंड येथे गेल्यानंतर सर्वप्रथम अकांउट विभागाचे क्लार्क श्री. ओंकार मेनसे यांची भेट घेतली. त्यावेळी सुरवातीपासून ते अखरेपर्यंत पंच क्र. 1 श्री. मुळे हे सोबत उपस्थित असल्याचे सांगितले. तसेच तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार यांनी मेनसे यांचेशी तक्रारदार यांच्या प्रलंबित बिलासंदर्भात पुढील प्रमाणे चर्चा केली. तक्रारदार म्हणाले की, "मला एक पैशाचा हिशोब असाच सांगा, येळवे मॅडम, येळवे मॅडमला आपण पुण्याई सिक्युरिटी व पुण्याई एंटरप्रायझेसचे किती देतोय. प्रत्येक वेळेस तर तुमच्याकडे देतोय" असे म्हणाले. त्यानंतर ओंकार मेनसे तक्रारदार यांना "साडे तीन, साडे तीन, साडे तीन
"असे म्हणाले. तसेच तक्रारदार त्यांना "हा, दहा हजार म्हणजे किती मागितले त्यांनी" असे म्हणाले. त्यावर मेनसे हे

तक्रारदार यांना "साडे दहा" असे म्हणाले. नंतर तक्रारदार यांनी मेनसे यांना "साडे दहा ते कशाचे आता" असे विचारले त्यावर मेनसे तक्रारदार यांना "पहिले व्यवहाराचे" असे म्हणाले. नंतरकावळे यांच्याकरीता रू. 45,000/- लाचेची मागणी करून लाच रक्कम क्लर्क श्री. ओंकार मेनसे यांच्याकडे देण्यास सांगितली असल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून माझी दौंड नगरपरिषद येथील नेमणुकीस असणारे लोकसेवक क्लर्क श्री. ओंकार मेनसे व लोकसेविका लेखापरिक्षक श्रीमती येळवे यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली असून माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. तक्रारदार यांनी, "बर, बर आता हयाचे किती?" असे विचारले तेव्हा मेनसे हे तक्रारदार यांना "तेच, साडे दहा" असे बोलले. नंतर तक्रारदार त्यांना "वाढवुन द्या म्हणतात ना, दहा हजार रुपये, दहा म्हणतात. मलाच काय कळना मगाशी, मला तर सोडून दयाची अशी परस्थिती झाली माझी" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी श्री. मेनसे यांचेशी कामासंदर्भातील इतर गप्पा मारून तक्रारदार श्री मेनसे यांना म्हणाले की, "मला त्यांना भेटायचय की, सिक्युरिटीचे आपण किती देतो." त्यावर मेनसे म्हणाले की, "साडे तीन". त्यावर श्री मेनसे यांना तक्रारदार म्हणाले की, "साडे दहा, साडे सात हजार आणि साडे तीन, दहा हजार रुपये आपण त्यांना देतो बर प्रत्येक महिन्याचे. पेमेंट त्यांनी घेतले तरी वाढवुन वाढवुन कस देणार, तुम्ही मला सांगा काय राहतय त्यात-वगैरे" त्यावर मेनसे तक्रारदारांना म्हणाले की, "ते तर आहेच, त्याच काय म्हणण, मागचे काहीतरी मागितले साहेबांनी, परत आत्ताचे साडेतीन असे काहीतरी सांगितले आणि ते तीन चेक देणे असे झाले होते. टोटल त्यांनी काल अठरा हजार सांगितले होते." त्यावर तक्रारदार हे अठरा हजार? असे बोलले असता मेनसे म्हणाले की, "पहिले साडेदहा, आत्ताचे काहीतरी." त्यानंतर पुर्वीच्या बिलासंदर्भात चर्चा सुरु असताना तक्रारदार मेनसे यांना म्हणाले की, "तुम्हाला तुमच पाकिट किती दिलेल मी" असे विचारले. तेव्हा श्री. मेनसे यांनी "मला दहा" असे म्हणाले. नंतर तक्रारदार त्यांना "दहा. आताच तुमच पाकीट किती ये?" असे विचारले. नंतर तक्रारदार त्यांना "बरोबर य तुमच परत मला तुम्हाला नाही नाही मागच्या वेळेस मी तुम्हाला दयाच्या रक्कम दिल्या म्हणजे आता समजा तुम्हाला पाच दिले. मला रक्कम नाही ना साहेब पाच हे तुमचे रेग्युलर आहे ना. हयाच्या पेक्षा

जास्त मला तुम्ही कधी मागितले का तुम्ही सांगा, ह सांगाना तुम्ही" असे म्हणाले. तेव्हा मेनसे तक्रारदार यांना नाय नाय असे म्हणाले. एकंदरीत श्री.मेनसे यांच्याकडे तक्रारदार यांना पंचासह पाठवून केलेल्या पडताळणीदरम्यान तक्रारदार यांनी लेखापरिक्षक श्रीमती येळवे यांना मेनसे यांचे मार्फतीने पुर्वीची लाचेची रक्कम स्विकारल्याचे मान्य केले. तसेच त्यांना यापुर्वी दहा हजार रूपये दिल्याचे त्यांनी मान्य केले. श्री मेनसे यांनी दर महिन्याप्रमाणे स्वत: करिता पाच हजार रूपये लाच मागणी केल्याचे आणि श्रीमती येळवे यांच्याकरीता रू. 10,500/- लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 हे लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे यांच्या केबीनमध्ये गेले. त्यांचेशी तक्रारदार यांनी त्यांच्या बिलांसंदर्भात चर्चा केली त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेविकेने सांगितलेल्या लाचेच्या रकमेपैकी काही रक्कम कमी करण्याचे दृष्टीने विचारले की, "मग आता मला जे सांगितलत होत, मला विचारयच होत, लोड कमी करता का, लोड" तेव्हा त्या तक्रारदार यांना हसत "का, काय झाल" असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "मला तिकडुन निरोप आलताना, तुम्ही किती देणार ये, तुम्ही आणि अकरा" असे म्हणाले, त्यावर त्या तक्रारदारांना म्हणाल्या की, "मागचे अठरा मागचे आपण, हे चौथे बिल ये. तेव्हा मी त्यांना आपल किती होतात" असे म्हणाल्या त्यानंतर त्यांनी कॅलक्युलेटर काढून "चार समथिंग होतात ना, एक अड्ढोतीस आणि तीन अठ्ठावन सॉरी दोन अठ्ठावन किती होतय" असे चेकवरील रकमेनुसार गणना करीत तक्रारदार यांना म्हणाल्या. त्यानंतर त्यांनी "म्हणजे हे बघा, मग साडे तीन, साडे तीन पकडले वर" असे तक्रारदार यांना म्हणत परत कॅलक्युलेटरवर गणना करीत "तीन पॉइंट पाच गुनिले चार" असे बोलुन कॅलक्युटरवर टाईप केले व तक्रारदारासमोर कॅलक्युलेटर धरले त्यावर 14,000/- लिहलेले होते असे तक्रारदार यांनी सांगितले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "किती? चौदा हजार" असे विचारले तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना "एकच एकच ह्यानी बधीतल आणि त्याचे तीन होते आपले" असे म्हणून, तक्रारदारांना पुर्वी केलेल्या कामाचे अतिरिक्त तीन हजार रूपये मागितले. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना "तुमची काय, तुम्ही तुमची काय इच्छा असेल" असे म्हणाले, तेव्हा तक्रारदार त्यांना "माझी काही इच्छा नाही" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेशी इतर बोलणी करून नंतर त्यांना "ठीक ये, मी देतो, आता तुम्हाला किती द्यायचे मला क्लियर सांगा मला" असे म्हणाले. त्यावर लोकसेविका तक्रारदार यांना "तुमची जी इच्छा ये ना" असे म्हणाल्या
तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना डिसेंबर महिन्याच्या बीलाबाबत विचारणा केली त्यावर त्या तक्रारदाराला
"आठवड¬ात थांबा" असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "मग आता हे तुमच्यापशी देवु का, आणुन मी"
असे विचारले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "नाही, ओंकारकडे द्या" असे म्हणून लाच रक्कम ओंकार मेनसे यांच्याकडे
देण्यास सांगितले आणि "सीओ साहेबाच त्याच्यापशी देवु का?" असे तक्रारदारांनी विचारले असता लोकसेविका
येळवे यांनी "सरच, हा देवुन टाका" असे तक्रारदारांना म्हणाल्या. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना विचारले की, "तुम्ही
जे सांगितल्याल तो आकडा साडे अकरा हजार रुपये तो". त्यावर येळवे तक्रारदारांना म्हणल्या की, "हा अठरा",
तेव्हा तक्रारदार त्यांना म्हणाले की, "आणि अं... अठरा", त्यावर श्रीमती येळवे तक्रारदारांना म्हणाल्या की, "त्यात
तुम्हाला जेवढ". त्यावर तक्रारदार म्हणाले की, "अठरा", त्याबाबत श्रीमती येळवे तक्रारदार यांना म्हणाल्या की,
"त्यात तुम्हाला काय कमी करायच", त्यावर तक्रारदार त्यांना म्हणाले, "नाही नाही करु". त्यानंतर तक्रारदार
श्रीमती येळवे बोलल्या की, "नाही चालतय मी, तुमच अठरा हजार करतो का साडे अठरा हजार करु". त्यावर येळवे
म्हणाल्या की, "काय करायच ते करा". तेव्हा तक्रारदार त्यांना म्हणाले की, "नाही अठरा, साडे अठरा." त्यावर
श्रीमती येळवे म्हणाल्या की, "पंधरा करा, चौंदा करा". तक्रारदार त्यांना म्हणाले, "नको ना" त्यानंतर श्रीमती येळवे
तक्रारदारांना "चौदा करा, तुम्हाला जे करायच करा माझ काहीही म्हणण नाही" असे म्हणाल्या. तक्रारदार श्रीमती
येळवे यांना म्हणाले की, "व्यवहारात पाप नको" आणि तेव्हा श्रीमती येळवे तक्रारदार यांना म्हणाल्या की, "त्यात
काय तेव्हा" त्यावर तक्रारदार त्यांना म्हणाले की, "आणि त्याच झाल, साहेबच तुमच्यापशी, आता साहेबाचे बघा
कशेत ते, अं, त्याला सिक्युरिटीच त्यांनी लावून धरलय सारखच म्हणल.. हे किती ते किती" त्यावर श्रीमती येळवे
तक्रारदार यांना म्हणाल्या की, "पंचवीस हजार" तेव्हा तक्रारदारांनी "पचंवीस हजार आणि इंटरप्रायजेसचे वीस
हजार म्हंजे किती?". असे श्रीमती येळवे यांना विचारले त्यावर येळवे म्हणाल्या की, "पंचेचाळीस", तक्रारदार त्यांना
बोलले की, "पंचेचाळीस त्याचे दोन पाकिट वेगळी करतो". तेव्हा श्रीमती येळवे यांनी तक्रारदारांना "हा.. ते पण"
असे म्हणून तक्रारदाराशी इतर चर्चा सुरू केली अशी माहिती तक्रारदार यांनी सांगितली तसेच त्यांचे
पडताळणीदरम्यान पंच क्र. 1 हे सोबत असल्याची माहिती दिली.

एकंदरीत लोकसेविका लेखापरिक्षक श्रीमती येळवे यांच्याकडे तक्रारदार यांना पंच क्र. 1 श्री. विशाल मुळे यांच्यासह पाठवून करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान श्रीमती येळवे यांनी तक्रारदाराकडे प्रत्येक महिन्याचे पुण्याई सिक्युरिटी व पुण्याई एंटरप्रायझेसचे प्रत्येकी साडेतीन हजार रूपये प्रमाणे बिल पास केल्याचा मोबदला म्हणून दोन महिन्यांचे एकुण रू. 14,000/- लाचेची मागणी केली तसेच पुर्वी केलेल्या कामाचे रू.3,000/- अशी लाचेची

मागणी केली त्यांना तक्रारदारांनी तुमच अठरा हजार करतो का साडे अठरा हजार करु असे विचारले असता श्रीमती येळवे यांनी तक्रारदारांना "काय करायच ते करा, पंधरा करा, चौंदा करा, तुम्हाला जे करायच करा. माझ काहीही म्हणण नाही" असे म्हणून, तक्रारदाराकडे पंधरा हजार किंवा चौदा हजार रूपये असे म्हणून लाचेची मागणी केलेली आहे. तसेच सी.ओ. श्री कावळे यांच्याकरीता रू. 45,000/- लाचेची मागणी केली आहे. तसेच त्यांची व सी.ओ. श्री. कावळे यांची लाच रक्कम क्लर्क श्री. ओंकार मेनसे यांच्याकडे देण्यास सांगितली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार मुख्याधिकारी श्री. विजय कावळे साहेबांचे केबीनमध्ये गेले. तेव्हा लागलीच लोकसेवक श्री. कावळे हे ब्राहेर आले, तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "सर ऐकाना, मला कधी भेटायच होत मी मिटींगला भी नाही तुमच्या" असे बोलले. तेव्हा श्री. कावळे यांनी तक्रारदारांना "मिंटींग कुठ झालीय बर मिंटीगच्या बाहेर" असे म्हणाले. तक्रारदार कमी आवाजात मुख्याधिकारी श्री. कावळे साहेबांना, "बर ऐका ना ते पुण्याई सिक्युरिटीजचे वीस हजार आणि पुण्याई एंटरप्रायझेसचे पंधरा हजार देऊ का" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक श्री. कावळे यांनी त्यांना "करून घ्या, करून घ्या" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना "येळवे मॅडमकडे करू ना" असे विचारले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "हो करून घ्या" असे पुन्हा बोलले. ही सर्व घटना पंच क्र. 1 श्री. विशाल मुळे यांचेसमक्ष घडलेली असल्याची माहिती तक्रारदार यांनी आम्हाला दिली. परंतु सदरचे संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार यांचेसमक्ष ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक श्री. कावळे व तक्रारदार यांचेमध्ये झालेल्या संभाषणामध्ये लाचेसंदर्भातील बोलणी झाल्याचे दिसून आले नाही.

त्यामुळे तक्रारदार यांना मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांचेकडे परत एकदा पाठवून लाच मागणीसदंर्भात पुन्हा एकदा पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानुसार तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईल नंबरवरून लोकसेवक मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांच्या मोबाईलवर 15.21 वाजता कॉल केला व स्पिकर ऑन केला. तो कॉल व्हाईस रेकॉर्डरचे सहाय्याने ध्वनिमुद्रीत केला. परंतु त्यांचा कॉल व्यस्त असल्यामुळे कॉलवर सं◌ंभाषण झाले नाही. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद केला. नंतर काही वेळ थांबल्यानंतर 15.27 वा. तक्रारदारांनी त्यांच्या मोबाईल नंबरवरून मुख्याधिकारी श्री. कावळे यांच्या मोबाईल नंबरवर कॉल केला व मोबाईलचा स्पिकर ऑन केला सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरचे सहाय्याने रेकॉर्ड केला त्यावेळी रिंग वाजल्यानंतर मुख्याधिकारी श्री. कावळे यांनी कॉल उचलला व ते तक्रारदारांना म्हणाले की, "शफीक भाई बोलाना" त्यावर तक्रारदारांनी त्यांना भेटण्याची वेळ मागितली असता, त्यांनी तक्रारदार यांना "ठीक्रय बोलतो मॅडमशी मी" असे बोलून भेटण्याचे टाळले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना दौंड नगरपालिका येथील कामाचे दोन चेक निघाले असल्याचे बोलले असता, त्यांनी तक्रारदारांना "नाय नाय मी काय म्हणायलोय, मी मॅडमशी बोलतो करून टाकता"◌े असे म्हणाले. नंतर तक्रारदार सी.ओ. श्री. कावळे यांना "मग मी मॅडमला भेटतो हा मॅडमला सांगा मग" असे म्हणाले. तेव्हा ते तक्रारदारांना "ठीकय" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदारांनी फोन कट केला.

तक्रारदारांनी मुख्याधिकारी श्री. कावळे यांचेशी फोनवरून केलेल्या संभाषणावेळी त्यांनी श्रीमती येळवे भेटण्यास सांगितल्याने पडताळणीकामी तक्रारदारांना पुन्हा एकदा लोकसेवक लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे यांच्याकडे पाठविणचे ठरविले. त्यानुसार तक्रारदारांना पुन्हा एकदा सुचनांची उजळणी करून शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यांच्या शर्टच्या आतुन बनियनला डाव्या बाजुस कोणास दिसणार नाही असा लावला. त्यानंतर तक्रारदारांना त्यांच्या नातेवाईकांच्या रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 हीमधून पंच क्र. 1 श्री. मुळे यांचेसह 15.36 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार हे दौंड नगरपरिषद कार्यालय, दौंड येथे गेले. तेथे त्यांनी लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे यांची भेट घेतली व त्यांना सी.ओ.साहेबांशी बोलणे झाले आहे. त्यांनी तुमच्याशी बोलणी करतो असे आम्हाला कॉलवर सांगितले आहे असे सांगितले. त्यानंतर श्रीमती भाग्यश्री येळवे त्यांना म्हणाल्या की, "काय झाल, मी त्यांना फोन केला होता, ते म्हणले मी येळवे मॅडमशी बोलतो". तेव्हा त्या तक्रारदार यांना म्हणाल्या की, "बोलते मी त्यांच्याशी." त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना "फोन लावाना" असे म्हणाले. त्यावर त्यांनी तक्रारदारांना "उचलला नाही आ आणि एकदाच सरांना फोन लावत असते" असे सांगितले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "मी आलोय म्हणून सांगा की, मुलाणी साहेब आलेत आणि त्यांनी सांगितले की तुम्ही बोलता आणि विचारुन" असे बोलब्बे. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "दोन लावलेत तुम्ही बघा दोन" असे म्हणून दोनदा कॉल केल्याचे दाखविले. नंतर त्यांना तक्रारदारांनी "एक लावा, आता मला म्हणलेत ते, तर मग तुम्ही काय करा किती पैसे दयाचे ते मला विचारुन सांगा मग मी क्लिअर करतो. अन काशाला काय होतय कमी दिले, जादा दिले डोके दुखी नको मग, आता हे दोन" असे म्हणाले. परंतु त्यांनी परत कॉल केला नाही. नंतर श्रीमती येवळे यांनी पंचांकडे पाहत "हा मुलगा आहे का? तुमचा" असे विचारले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "भाचा" असे सांगितले. त्यानंतर त्यांचेशी तक्रारदारांनी इतर चर्चा केली. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "लगेच जाऊन बँकेतून पैसे काढून घ्या" असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांच्यासह रेनॉल्ट डस्टरकारने परत पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी साधारणपणे 16.43

वाजण्याचे सुमारास परत आले. तशी सविस्तर माहिती तक्रारदार व पंच क्र. 1 यांनी दिली तसेच त्याबाबतचे ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर दि. 07/03/2025 रोजीची पडताळणी कारवाई ही स्थगित केली. घडलेल्या घटनेचा सविस्तर पंचनामा करणेकामी गोपनीयतेच्या कारणास्तव ला.प्र.वि. पुणे येथे येऊन तेथे सविस्तर पंचनामा केलेला आहे. दिनांक 08/03/2025 रोजी शनिवार व दिनांक 09/03/2025 रोजी रविवार अशी शासकीय सुट्टी असल्यामुळे पुढील पडताळणी ही सोमवार दिनांक 10/03/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

दिनांक 10/03/2025 रोजी पुन्हा एकदा पडताळणी करण्याकरीता आम्ही, दोन पंच, पडताळणी पथकासह शासकीय वाहनाने पंचनाम्याकरीता लागणारे सर्व साहित्यांसह दौंड शुगर कारखाना रोडवर हॉटेल महाराजसमोरील पार्कींग येथे पोहोचलो. तक्रारदार हे सुध्दा त्यांचे नातेवाईकांची रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 हीमधुन तेथे 11.20 वा. पोहोचले. तेथून आम्ही सर्वजण म्हसोबा मंदीर, एस.आर.पी.एफ.ग्रुप क्र. 5, दौंड या ठिकाणी गेलो.

त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नवीन सीलपॅक मेमरी कार्ड बसविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 श्री. मुळे यंाचे पडताळणी कारवाईचे निवेदन 11.47 वा. ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर तक्रारदार, पंचांना व पडताळणी पथकास पडताळणीचे अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक मुख्याधिकारी श्री. कावळे व लोकसेविका श्रीमती येळवे यांची नगरपरिषद कार्यालय, दौंड येथे जाऊन भेट घेणार असल्याने शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर ठेवून तक्रारदाराचे काखेत डावे बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही असा लावला. तक्रारदार व पंच क्र. 1 श्री मुळे असे रेनॉल्ट डस्टर कार नं. एम. एच. 42 झेड. 1001 हीमधून लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता 11.57 वा. रवाना झाले व नगरपरिषद कार्यालय, दौंड येथे पोहोचले तेथे दौंड नगरपरिषदेचे सी.ओ.श्री. विजय कावळे साहेब हे मिटींगमध्ये व्यस्त होते. त्यामुळे तक्रारदार व पंच क्र.1 असे दोघेही थांबून राहीले. साधारणपणे पाऊन तास तेथे थांबल्यानंतर सी.ओ. कावळे साहेब हे बाहेर जाऊ लागले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "सर" असे म्हणत त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "याकी, याकी, याकी" असे म्हणत त्यांचेसोबत चालायला सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "त्यांनी ते पुरक आदेश तसाच ठेवुन घेतलाय मला ती व्हाचउर बी टाकता येईना" असे म्हणत, त्यांच्या पुरक आदेशावर सही झाली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आणून दिले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "कोणाकडंय" अस विचारले. तेव्हा तक्रारदार हे त्यांना "तुमच्याकडय सहीला, मला सही द्या पहिली" असे म्हणाले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "देतो, देतो" असे म्हणाले. नंतर तक्रारदारांनी त्यांच्याशी पुरक आदेश पेंडिंग असुन त्यावर सही देणबाबत त्यांचेशी बोलणी केली. सीओ साहेबांनी सागर नावाचे व्यक्तीस बोलावुन पुरक आदेशाचा काय ते बघ असे सांगितले. नंतर तक्रारदारांनी सी.ओ.साहेबांना "तुमची ही नाय ना, हं, मला ते काय झालय, तो पुरक आदेश दयायचा राहीलाय.. दोन महिन्याचा गार्डतर काम कराव्यात.अं.." असे म्हणाले. तेव्ही ते तक्रारदारांना "करुन टाकू" असे दोनदा म्हणाले. तेव्हा तक्रारदारांनी त्यंाना "कधी" असे विचारले. त्यावर त्यांनी "करुन टाकु, एवढा ट्रेस घेवु नका, करुन टाकु" असे म्हणाले. तक्रारदारांनी त्यांना "कधी" असे विचारले. तेव्हा त्यांनी "मॅडमला बोलतो मी, लगेच" असे सांगितले. त्यानंतर त्यांचेत इतर चर्चा झाली. तेथुन तक्रारदार लेखापरिक्षक श्रीमती भाग्यश्री येळवे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे केबीनमध्ये गेले. तेव्हा तक्रारदार हे त्यांना पैसे देण्यासाठी आले आहेत असा समज करून लोकसेविका श्रीमती येळवे यांनी तक्रारदारांना "ओमकारला भेटा ना, उभा राहीलाय बाहेर" असे म्हणाल्या, तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "हा भेटतो ना, एक विषय चर्चा करायची होती, एक दोच मिनिट फक्त, काय झालय तो पूरक आदेश बी राहीलाय ना, डिसेंबर मध्ये आपला सेक्युरिटी आदेश संपलाय, पुरक आदेश वाघमोडे साहेबांनी ठेवलाय" असे म्हणाले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "कशात ठेवलाय" असे विचारले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "पुरक आदेश" असे विचारले. तेव्हा त्या तक्रारदारांना "हा" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदारांना "वाघमोडे साहेबांनी ठेवलाय" तसेच तक्रारदार त्यांना "मग आता तुमचं सरांच बोलणं झाल का? काय होत, परत काय होतया पैसे तर दयायचे परत कमी दिले आणि जास्त दिले सर तुम्हांला काय म्हटले का?" असे म्हणाले. तेव्हा लोकसेकविका श्रीमती येळवे तक्रारदारांना "नाही मला काय च नाही बोलले सर...मला काय च नाही म्हणले सर" असे म्हणाल्या. त्यानंतर त्यांनी त्यांच्या मोबाईलवरुन दोन वेळा सी.ओ.कावळे सरांना फोन केला. परंतु त्यांनी त्यांचा मोबाईल रिसीव्ह केला नाही. नंतर त्यांनी तक्रारदारांना कळविले की, "मला फोन नाही झाला मी आता फोन केला होता सरांना रिप्लाय नाही दिला खाली" असे त्या म्हणाल्या. त्यानंतर त्या तक्रारदारांना म्हणाल्या की, "मी काय म्हणतेे की की जो तुम्ही आधी काय करत होते, किती करत होते ते माहित नाही मला" तेव्हा तक्रारदार त्यांना "हां" असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी तक्रारदारांना "मला तुमचे जे असेल ते ठरलेलय जर काय आल तर मी तुम्हाला सांगते जर काय मला म्हणलेच असे" असे म्हणाल्या. तसेच "की मॅडम अस करा तस करा" असे

तक्रारदारांना म्हणाल्या. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "जे रेग्युलर आहे ते देऊ?" असे प्रश्नार्थक विचारले. त्यावर त्यांनी तक्रारदारांना "हां.." असे म्हणाल्या नंतर तक्रारदारांनी त्यांना "म्हणजे वीस हजार रूपयांपर्यंत देत होतो त्यांना" असे विचारले तेव्हा त्या तक्रारदारांना "तुमच जे असेल ती असल" असे म्हणाल्या तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "आणि पाणी पुरवठयाचे पंधरा" हेसुध्दा सांगितले तेव्हा तक्रारदारांना त्या परत "हां..तुमचं जे असल ती असल" असे म्हणाल्या. नंतर त्यांनी इतर बोलणी केली. नंतर तक्रारदारांनी त्यांना विचारले की, "मंग आता हे जे रेग्युलरयत हेत आपण देतच होतो, ते तुम्हीच त्या दिवशी मला म्हणले ना हे पाठीमागच्या महिन्यांच ऑक्टोबरच मी तुम्हांला पेमेंट दिल अन सर म्हणतात मला पोहचलं नाय... ऑक्टोंबर" तेव्हा लोकसेविका श्रीमती येळवे तक्रारदारास म्हणाल्या की, "ते तुमच हे करा जरी काय झाल तर मग परत दया" तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "ठिक य मग मी काय आता रेग्युलर प्रमाणे हे करू का" असे विचारले तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "हां.." असे सांगितले. नंतर तक्रारदारांनी त्यांना "मी त्यांचे सिक्युरिटीचे वीस हजार रूपये देत होतो" असे सांगितले. तेव्हा त्यांनी "तुमचं जी असल ती असल" असे तक्रारदारांना म्हणाल्या, नंतर तक्रारदारांनी त्यांना "पंधरा ऐकाना पाणी पुरवठा पंधरा अस होत ना" असे विचारले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "हा मग ठिक हे ना तुमचं जी असल ती असल सर लोड नका घेऊ एवढया गोष्टीचें अस म्हणते मी" असे म्हणत सी.ओ.कावळे यांच्याकरीता पैशांची मागणी केली. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना सिक्युरिटीचा पुरक आदेश निघाला नसलेबाबत पुन्हा चर्चा केली. त्यावर त्यांनी तक्रारदारांना वाघमोडे सरांची भेट घेऊन त्यांच्याकडून पुरक आदेश तयार करून घेण्याबाबत सांगितले. त्यानंतर तक्रारदारांनी श्रीमती येळवेसोबत ऑफीसमधील इतर कामासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर श्रीमती येळवे तक्रारदारांना म्हणाल्या की, "मी सरांना म्हणते होते की, तुमंच काय ते बघुन घ्या, काय झालय, नाय झालय, पण माझ्या तरी डोक्याला नका हे करु" तेव्हा तक्रारदार त्यांना "हां..हां.." असे म्हणाले. तेव्हा लोकसेविका येळवे तक्रारदार यांना म्हणाल्या की, "त्याच हिथुन पुढ त्याच त्याच रेग्युलर असल" असे म्हणून यापुढे प्रत्येक महिन्याकरीता होणारे लाच मागणीस दुजोरा दिला. त्यानंतर परत एकदा श्रीमती येळवे तक्रारदारांना म्हणाल्या की, "जे हिथुन पुढ ये, रेग्युलर जे मी घेवुन जाते, जे असल ते रेग्युलर असल" तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "हा" असे म्हणाले. नंतर श्रीमती येळवे यांनी तक्रारदार यांना "तुमचा आदेश झाला बील झाल, पुढच पुढच रेग्युलर काय ते" असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार त्यांना "हा क्लीयर ये, मी आतापर्यत म्हंजी मला हा पाश्चताप का होतोय माहितेय का" असे म्हणाले. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना "तुम्ही नका पाश्चाताप करु, एक घाव दोन तुकडे करायचे असत्यात माणसाने" असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार त्यांना "अहो मी, सिक्युरिटीच.20 हजारच पाकीट दिल, पाकीट त्याच्यासमोर फुटलेल गेलय.. फुटलेल्या पाकीटला मी काय करणार" असे म्हणाले. नंतर त्या तक्रारदारांना "जाउ द्या" असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार त्यांना "पाणी पुरवठ¬ाच 15 हजारने गेलय" असे म्हणाले. चर्चेनंतर तक्रारदार श्रीमती येळवे यांना "हे नोव्हेंबरच आत्ताच हे मी नोव्हेंबरच तुमच क्लीयर" असे म्हणाले. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना "नोव्हेंबरच, डिसेंबरच तुमच पुटप नाही झाल" असे म्हणाल्या. नंतर तक्रारदार त्यांना "मी बॅकेत गेलो होतो. बँकेतन पैसे काढुन आणलेत, मग तो विषय संपवुन टाकु" असे म्हणाले. तेव्हा श्रीमती येळवे तक्रारदारांना म्हणाले की, "हा ठीक ये, वाघमोडे सराना सराच्या कानावर घालायला सांगा" असे म्हणाल्या. त्यानंतर त्या दोघांमध्ये अवांतर बोलणी झाली. नंतर तक्रारदारांनी त्यांना "हा बर पैसे कुणाकडे देवु हे, ओंकारकडे हा" असे विचारले. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "त्यांच्याकडे" असे म्हणाल्या. नंतर तक्रारदारांनी त्यांना "साहेबांच बी... नाहीतर काय होयच परत हे तुटल" असे विचारले. त्यावर त्यांनी तक्रारदारांना "नाही होणार, तुम्ही विश्वास ठेवा" असे सागितले. नंतर तक्रारदारांनी त्यांना "ठीक ये, मी तुम्हाला बघुन हे विषय संपवणार" असे बोलले. त्यानंतर त्यांनी तक्रारदारांना नगरपरिषदेतील वाघमोडे यांची भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदारांनी श्री. वाघमोडे यांची भेट घेतली. त्यांनी तयार केलेला, मुख्याधिकारी यांची सही नसलेल्या पुरक आदेशाची प्रत तक्रारदार यांनी वाचली व जानेवारी पासून सिक्युरिटी संदर्भातील पुरक आदेश होण्याबाबत दिलेली टिपण्णी त्यांचे सोबत घेतली व परत श्रीमती येळवे यांची भेट घेतली. त्यावेळी श्रीमती येळवे यांनी तक्रारदाराकडील पुरक आदेशावरील टिपणी वाचली व चर्चा करून तक्रारदाराकडे परत दिली. त्यानंतर त्याठिकाणाहुन तक्रारदार व पंच क्र. 1 असे दोघेजण त्यांच्याकडील रेनॉल्ट डस्टरकारने परत 13.51 वाजता आले तशी सविस्तर माहिती तक्रारदार व पंच क्र. 1 यांनी दिली तसेच त्याबाबतचे ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर लोकसेवक श्री. विजय कावळे यांची भेट घेणे गरजेचे असल्याने त्यांची भेटीची वेळ घेण्याकरीता तक्रारदारांनी त्यांच्या मोबाईलवरून 17.46 वाजता कॉल केला. परंतु लोकसेवक श्री. कावळे यांनी तो कॉल उचलला नाही. सदरचा कॉल हा व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड केलेला आहे. त्यानंतर पुन्हा एकदा तक्रारदारांच्या मोबाईलवरून लोकसेवक श्री. विजय कावळे यांचे मोबाईल फोनवर 18.08 वाजता कॉल केला. परंतु लोकसेवक श्री. कावळे यांनी तो कॉल उचलला नाही. सदरचा कॉल हा व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड केलेला आहे. त्यानंतर लोकसेवक श्री. विजय कावळे यांची कार्यालयीन वेळ संपली असल्याने दिनांक 10/03/2025 रोजीची पडताळणी

कारवाई स्थगित करून दिनांक 12/03/2025 रोजी पुढील पडताळणी करण्याचे ठरले. घडलेल्या घटनेचा सविस्तर पंचनामा करणेकामी गोपनीयतेच्या कारणास्तव ला.प्र.वि. पुणे येथे येऊन तेथे सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दिनांक 12/03/2025 रोजी लोकसेवक मुख्याधिकरी श्री. विजय कावळे यंाचेबाबत तक्रारदारांनी परस्पर माहिती घेतली असता ते दि. 13/03/2025 रोजीपर्यंत बाहेरगावी असल्याची माहिती मिळाली त्यानंतर पुढील पडताळणी ही दिनांक 17/03/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले होते. दिनांक 17/03/2025 रोजी लोकसेवक मुख्याधिकारी श्री. विजय कावळे व लोकसेविका श्रीमती भाग्यश्री येळवे या कार्यालयात उपस्थित नसल्याची माहिती तक्रारदारांना प्राप्त झाली त्यामुळे पडताळणी कारवाई दिनांक 18/03/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले होते. त्यानुसार दिनांक 18/03/2025 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, पुणे येथील पडताळणी पथक व दोन्ही पंचांसह शासकीय वाहनाने एस.आर.पी.एफ.कॅम्प येथील म्हसोबा मंदीर या ठिकाणी पंचनाम्याकरीता लागणारे सर्व साहित्यांसह पाहोचलो. तोपर्यंत 14.35 वाजण्याचे सुमारास तक्रारदार त्यांचे नातेवाईकांची रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 हीमधुन पोहोचले. त्यानंतर तक्रारदारांना शासकीय वाहनात घेतले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दिनांक 10/03/2025 रोजी पडताळणी पंचनाम्यादरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार व पंच नं. 1 श्री. विशाल मुळे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 15.25 वा. ध्वनिमुद्रीत केले. तक्रारदार, दोन्ही पंच व पडताळणी पथकास पडताळणीचे अनुशंगाने सुचना दिल्या. व्हाईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर ठेवून तक्रारदाराचे काखेत बनियनला कोणास दिसणार नाही असा लावला आणि तक्रारदार व पंच क्र. 1 श्री. विशाल मुळे यांना त्यांच्याकडील रेनॉल्ट डस्टर कार नं. एम.एच. 42 झेड. 1001 हीमधून लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता 15.33 वाजता रवाना केले.

तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह दौंड नगरपरिषद कार्यालय, दौंड येथे गेले असता तेथे दौंड नगरपरिषदेचे सी.ओ.श्री. विजय कावळे साहेब व क्लार्क श्री. ओंकार मेनसे हे कार्यालयात उपस्थित नव्हते. त्याचप्रमाणे लोकसेविका श्रीमती भाग्यश्री येळवे या देखील कार्यालयात उपस्थित नव्हत्या. काही वेळाने त्या कार्यालयात आल्या. तक्रारदार हे त्यांचे केबीनमध्ये गेले असताना श्रीमती येळवे ह्या त्यांना पाहुन गडबडीत कोठेतरी निघाल्या. तेव्हा तक्रारदारांनी श्रीमती भाग्यश्री येळवे यांना "मॅडम ते डिसेंबरच अन हयाच, व्हाउचर, व्हाउचर" असे विचारले. त्यावेळी त्यांनी "कोणती" असे विचारले. तक्रारदारांनी त्यांना "ए.एम.डी.च अन हयाची" असे सांगितले. त्यानंतर त्यांनी तक्रारदारांना "त्याच्या व सी.ओ.सरांच्या सहया झाल्यात का" असे विचारले. तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "हयांनी केल्यात" असे म्हणून तक्रारदाराच्या हातातील व्हाउचर दाखविली. तेव्हा त्यांनी तक्रारदारांना "नाय ना ते विभागप्रमुखांनाच दयायला सांगा, सरांनी स्ट्रीक्टली सांगितलय, जे कोण असल ते विभाग प्रमुख आणतील, तुम्ही आणायच... मी म्हणल ठीकय" असे सांगितले. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना "बर" असे म्हणाले. तेव्हा त्यांनी तकारदारांना "अशा सुचना त्यांनी एकदम मिटींगमध्ये दिल्यात" असेही सांगितले. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना "साहेबांनाच भेटु का डायरेक्ट" असे विचारले. त्यावर त्यांनी तक्रारदारांना "हयांना भेटायला सांगा ना, विभाग प्रमुखच भेटतील ना" असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार त्यांच्यापासून निघुन पंच क्र. 1 सह त्यांच्याकडील रेनॉल्ट डस्टर कारने 16.17 वाजता पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी पोहोचले. घडलेल्या घटनेचा सविस्तर पंचनामा करणेकामी गोपनीयतेच्या कारणास्तव ला.प्र.वि. पुणे येथे येऊन तेथे सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दोन ते तीन दिवसांनी तक्रारदार हे त्यांच्या कामानिमीत्त दौंड नगरपरिषद कार्यालयात गेले असताना, श्रीमती येळवे यांनी त्यांना बोलावून घेतले व त्या तक्रारदारांना म्हणाल्या की, "मी त्यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार केली आहे असे एकंदरीत हालचालीवरून त्यांना संशय वाटत आहे" असे त्यांनी तक्रारदारांना बोलून दाखविले आहे. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी कारवाई संदर्भात संशय आल्याने लोकसेवकांचा पुन्हा लाचेची बोलणी करण्यासाठी निरोप आलेला नाही. त्यामुळे लोकसेवक यांना तक्रारदारांचा संशय असल्याने ते पुढील लाचेची बोलणी करणार नाहीत व लाच स्विकारणार नाहीत त्यामुळे एकंदरीत झालेल्या पडताळणी कारवाईवरून लाच मागणी निष्पन्न झाल्याने लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्याकरीता मा.पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे यंाचे मार्फतीने मा. महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना परवानागी मिळण्याकरीता पत्रव्यवहार केला असता मा. महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र. 10078/2025, दिनांक 31/10/2025 नुसार व मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे यांचेकडील जा.क्र. सीआर/पुणे/2025-4024, दिनांक 03/11/2025 नुसार लोकसेवक श्री. ओंकार मेनसे व लोकसेविका श्रीमती भाग्यश्री येळवे यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिलेली आहे म्हणून आज रोजी सरकारतर्फे फिर्याद देत आहे.

तरी तक्रारदार श्री. फत्तुभाई ऊर्फ शफीक रहिमान मुलाणी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात

दिनांक 06/03/2025 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 07/03/2025 रोजी चे 12.11 ते 14.03 वाजेदरम्यान झालेल्या पडताळणी कारवाई मध्ये पंच क्र. 1 यांचेसमक्ष तक्रारदार यांच्या पुण्याई सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रायव्हेट लिमीटेड व पुण्याई एंटरप्रायझेस या खाजगी कंपन्यांचे दौंड नगरपरिषद येथे असणारे टेंडरची बिल काढण्याचे बक्षिस म्हणून दौंड नगरपरिषद येथील नेमणुकीस असणारे लोकसेवक क्लर्क श्री. ओंकार मेनसे यांनी स्वत:करीता, लोकसेविका श्रीमती येळवे व लोकसेवक मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांचेकरीता तक्रारदार यांचेकडून रू. 10,000/- लाचेची रक्कम यापुर्वी स्विकारल्याचे मान्य करून श्री मेनसे यांनी दर महिन्याप्रमाणे स्वत:करिता पाच हजार रूपये लाच मागणी केल्याचे आणि श्रीमती येळवे यांच्याकरीता रू. 10,500/- लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले आहे. तसेच दिनांक 07/03/2025 रोजी 12.11 ते 14.03 वाजेदरम्यान व दिनांक 10/03/2025 रोजी 11.57 ते 13.51 वाजेदरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान पंच क्र. 1 यांचेसमक्ष लोकसेविका लेखापरिक्षक श्रीमती येळवे यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येक महिन्याचे पुण्याई सिक्युरिटी व पुण्याई एंटरप्राइझेसचे प्रत्येकी साडेतीन हजार रूपये प्रमाणे बिल पास केल्याचा मोबदला म्हणून दोन महिन्यांचे एकुण रू. 14,000/- लाचेची मागणी केल्याचे तसेच पुर्वी केलेल्या कामाचे रू.3,000/- अशी लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदारांनी "तुमच अठरा हजार करतो, का साडे अठरा हजार करु?" असे विचारले असता श्रीमती येळवे यांनी तक्रारदारांना "काय करायच ते करा, पंधरा करा, चौंदा करा, तुम्हाला जे करायच करा, माझ काहीही म्हणण नाही" असे म्हणून, तक्रारदाराकडे पंधरा हजार किंवा चौदा हजार रूपये अशी लाचेची मागणी केलेली आहे. तसेच लोकसेविका श्रीमती येळवे यांनी सी.ओ. श्री कावळे यांच्याकरीता रू. 45,000/- लाचेची मागणी करून लाच रक्कम क्लर्क श्री. ओंकार मेनसे यांच्याकडे देण्यास सांगितली असल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून माझी दौंड नगरपरिषद येथील नेमणुकीस असणारे लोकसेवक क्लर्क श्री. ओंकार मेनसे व लोकसेविका लेखापरिक्षक श्रीमती येळवे यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.
दाखल -पो हवा /2241 राऊत
तपास-श्रीमती भारती मोरे सहा. पोलीस आयुक्त, पोलीस उप अधीक्षक /लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, मोनं 9870156586

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

GOPAL BASU PAWAR(I (Inspector)) / PBMAH79241 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

07/11/2025
सपोआ, जिला मिरवळ, लाप्रवि, पुणे

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GOPAL BASU PAWA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH79241